***भोसरी, पुणे येथील एम.आय.डी.सी. च्या भूखंडा संदर्भात ***

***महसूल मंत्री कार्यालयाचा खुलासा***

**मुंबई, दि.२३ मे २०१६**

**मुंबई दि. २३ मे** – भोसरी, पुणे येथील एम.आय.डी.सी. (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) मधील एका भूखंडाच्या संदर्भात काही वृत्तपत्रे तसेच काही वृत्त वाहिन्या मध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यासंदर्भात महसूल मंत्री कार्यालयाने पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे.

मौजे भोसरी, ता.हवेली, जि.पुणे येथील सर्व्हे नं. ५२/२/अ/२, क्षेत्र १ हे. २१ आर या जमिनीच्या ७/१२ वर मालकाचे नाव रकान्यात अब्बास रसुलभाई उकानी यांचे नाव नमूद आहे. सदर मिळकत उकानी यांच्या निर्बंधमुक्त मालकीची आहे. ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कात जरी एम.आय.डी.सी. (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) यांचे नाव असले तरी, एम.आय.डी.सी.कडून गेल्या ४० पेक्षा जास्त वर्षापासून भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली नाही, त्यामुळे श्री.उकानी यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली आहे. ही जमीन श्रीमती मंदाकिनी खडसे व इतर एक यांनी २८ एप्रिल,२०१६ रोजी नोंदणीकृत दस्तान्वये उकानी यांचेकडून खरेदी केली आहे. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम व नोंदणी अधिनियम अंतर्गत कायदेशीर प्रक्रिया राबवून संबंधित खरेदी व्यवहार पूर्ण करण्यात आला आहे. या जमिनीच्या भूसंपादना संदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळयांचे मार्फत स्वतंत्ररीत्या प्रक्रिया राबविण्यात येत असून खरेदी-व्यवहार व भूसंपादन कार्यवाही या दोन स्वतंत्र कायदेशीर प्रक्रिया आहेत व नियमानुसार संपादन कार्यवाही मंडळ स्तरावर होणार आहे. संपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याने आरक्षण बदलण्याचा प्रश्नच उद्भवत नाही

*****************************************************-************************************